## निशाणी क्र. ७३ कडील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने दावा मिळकतीवरील अतिक्रमण मोजण्यासाठी पारीत झालेला दिनांक १५/०६/२०१६ च्या आदेशामधील दावा मिळकतीचे वर्णन दुरुस्त होवून न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, मौजे निशाणी क्र. ५३ नुसार न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्यात आली होती. परंतू, प्रतिवादी यांनी मोजणीस विरोध केल्यामुळे मोजणी झाली नाही. त्यानंतर फेरमोजणी करीता न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्यात आली. परंतू, निशाणी क्र. ६५ कडील न्यायालयीन आयुक्ताच्या अहवालानुसार मौजे कोर्लई, ता. मुरुड येथील सर्व्हे नं. ७८ हिस्सा नं. ९ मध्ये नवीन हिस्से पडले आहे. त्यामुळे वादीने दाव्याचा विषय असलेली दावा मिळकत मौजे कोर्लई, ता. मुरुड येथील सर्व्हे नं. ७८ हिस्सा नं. ९/क क्षेत्र ०-२३-२ पैकी ०-०६-० व सदर मिळकतीत असलेले ग्राम पंचायत घर क्र. ३८४ त्याच्या उत्तरेस असलेली जमीन व वहीवाटीची जागा यांची मोजणी करण्याकरीता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादीने आपले म्हणणे दाखल करून या अगोदर अर्जामधील मिळकतीचे वर्णन चुकीचे असल्यामुळे आदेशात मिळकतीचे वर्णन तेच नमूद करण्यात आले. वादीचा उलटतपास पूर्ण झाला आहे. प्रस्तूतचा अर्ज वेळ काढू पणाने दाखल करण्यात आला आहे या कारणास्तव त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतचा दावा अतिक्रमण दुर करुन कब्जा परत मिळण्यासाठी दाखल करण्यात आला असल्यामुळे दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी दावा मिळकतीवर अतिक्रमण आहे का आणि असल्यास किती ही बाब अभिलेखावर येणे आवश्यक आहे. निशाणी क्र. ६५ कडील अहवालावरुन या अगोदर प्रतिवादींनी विरोध केल्यामुळे मोजणी करण्यात आली नाही असे दिसून येते. प्रस्तूत दाव्यात वादीच्या कथनानुसार दावा मिळकत मौजे कोर्लई, ता. मुरुड येथील सर्व्हे नं. ७८ हिस्सा नं.

९/क क्षेत्र ०-२३-२ पैकी ०-०६-० व सदर मिळकतीत असलेले ग्राम पंचायत घर क्र. ३८४ त्याच्या उत्तरेस असलेली जमीन व वहीवाटीची जागा हीच वादाचा विषय आहे. त्यामुळे सदर मिळकतीची मोजणी करण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची फेर नेमणूक करणे आवश्यक दिसून येते. करिता मी खालील आदेश पारीत करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उप अधिक्षक भुमि अभिलेख, मुरुड यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे कोर्लई, ता. मुरुड येथील सर्व्हे नं. ७८ हिस्सा नं. ९/क क्षेत्र ०-२३-२ पैकी ०-०६-० व सदर मिळकतीत असलेले ग्राम पंचायत घर क्र. ३८४ त्याच्या उत्तरेस असलेली जमीन व वहीवाटीची जागा या मिळकतीमध्ये किती अतिक्रमण आहे. याबाबत नकाशासह सुस्पष्ट अहवाल सादर करावा असा निर्देश देण्यात येतो.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी कमिशनचे काम करण्यापूर्वी वादी व प्रतिवादी यांना नोटीस द्यावी.

५. वादीने दिनांक १४/०७/२०२२ तत्पूर्वी पर्यंत नियमानुसार कमिशन फी भरावी.

६. न्यायालयीन आयुक्त यांनी दिनांक २१/०७/२०२२ पूर्वी पर्यंत आपला अहवाल न्यायालयात सादर करावा.

७. येणे प्रमाणे न्यायालयीन आयुक्तांना पत्र जारी करण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०७/०७/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड